एस.सी.सी.क्रं.६१६०/२०२०

नि. क्रमांक. ९ खाली .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ५ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की :-

माझे नाव :- मिना श्रीपती ठाकर,

वय सुमारे :- ६० वर्षे, व्यवसाय :- मजुरी,

निवासस्थान :- कान्हे फाटा, ता. मावळ, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत**

मी आमच्या कुटूंबामध्ये मी, सुना व नातवंडे असे मिळून एकत्र राहत आहे. दि. ०३/०२/२०२० रोजी माझे पती श्रीपती महादू ठाकर हे भंडारा डोंगर येथे धार्मिक कार्यक्रमासाठी जात होते. माझे पती ११.०० वा च्या सुमारास मुंबई पुणे महामार्गावर कान्हे फाटा येथील हॉटेल ब्लॉसम येथे आले असता पाठीमागून मुंबईकडून येणा-या चारचाकी गाडीने त्यांना ठोकर मारली. ठोकर मारणारा चालक शशिकांत कुटे हा गाडी चालवत होता. अपघाताची घटना मला ११.०० वा च्या सुमारास समजली होती. अपघातामध्ये माझ्या पतीच्या पायाला व डोक्याला मार लागला होता. अपघातानंतर माझा पुतण्या लक्ष्मण याने माझ्या पतीला औषधोपचारासाठी दवाखान्यात नेले. औषधोपचारादरम्यान माझ्या पतींचा मृत्यू झाला होता. तपासादरम्यान पोलीसांनी माझा जबाब नोंदवला. आरोपीस पाहिल्यास मी ओळखू शकते.आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री.विश्वनाथ जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**०२.** मी राहण्यासाठी सेवाधाम कान्हे फाटा येथे आहे. मी राहत असलेल्या ठिकाणाहून कान्हे फाटा येथे जाण्यासाठी अर्धा तास लागतो. लक्ष्मण ठाकर हा माझा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची माहिती मला लक्ष्मण ठाकर यांनी दिली होती. जबाब नोंदवण्यासाठी मी पोलीस ठाण्यात लगेच गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, जयेश शेटे हा

माझा नातेवाईक लागतो. विजय ढवळे हा माझा जावई आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची घटना मी प्रत्यक्षात पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा आरोपीच्या चुकीने झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

VISHNU RAMCHANDRA DOIFODE

Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2026.04.18 13:06:07 +0530

**दिनांक.१८/०४/२०२६**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**

एस.सी.सी.क्रं.६१६०/२०२०
नि. क्रमांक. ९ खाली .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-

माझे नाव :- ओमकार सोमनाथ ठाकर,

वय सुमारे :- २६ वर्षे, व्यवसाय :- नोकरी,

निवासस्थान :- तळेगाव, ता. मावळ, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत</u>**

मी आमच्या कुटूंबामध्ये आजी, आई वडील, चुलती व त्यांची मुले असे मिळून एकत्र राहत आहे. दि. ०३/०२/२०२० रोजी माझे आजोबा श्रीपती महादू ठाकर यांचा अपघात झाला होता. अपघाताच्या वेळी माझे आजोबा भंडारा डोंगर येथे धार्मिक कार्यक्रमासाठी सकाळी १०.३० वा च्या सुमारास निघाले होते. माझे आजोबा १०.४५ वा च्या सुमारास मुंबई पुणे महामार्गावर कान्हे फाटा येथील हॉटेल ब्लॉसम येथे आले असता पाठीमागून मुंबईकडून येणा-या चारचाकी ब्रिझा कारने त्यांना ठोकर मारली. सदर कारचा नोंदणी क्र. एम एच १४ एच के ९६६९ असा होता. अपघाताची घटना मला माझे चुलते लक्ष्मण ठाकर यांनी कळवली. अपघातानंतर माझे चुलते आजोबास रुग्णवाहिकेमधून औषधोपचारासाठी तळेगाव येथे घेऊन गेले. अपघातातील कार हा शशिकांत कुटे नावाचा व्यक्ती चालवत होता. आरोपीस पाहील्यास मी त्यांना ओळखू शकतो. औषधोपचारादरम्यान माझ्या आजोबांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पोलीसांनी आमचा जबाब नोंदवला. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री.विश्वनाथ जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**०२.** अपघात घडला त्यावेळी मी घरी कान्हे येथे हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, मुंबई पुणे महामार्ग हा पुर्च पश्चिम असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुंबईकडून आल्यानंतर चौकामधून टाकवे गावाकडे रस्ता जातो. हे म्हणणे खरे आहे की, टाकवे चौकामध्ये

झेब्रा क्रॉसींग आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुंबईकडून व पुणेकडून टाकवे गावाकडे जातांना वाहने कमी वेगात येतात. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची घटना मला माझ्या चुलत्यांनी सांगितली. हे म्हणणे खरे आहे की, अपघात घडल्याची घटना मी प्रत्यक्षात पाहिलेली नाही. पोलीसांनी माझा जबाब घटनेच्या दुस-या दिवशी नोंदवला होता. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये आरोपीची कसल्याही प्रकारची चुकी नाही. हे म्हणणे खरे नाही की. मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

VISHNU RAMCHANDRA DOIFODE

Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2026.04.18 13:06:17 +0530

**दिनांक.१८/०४/२०२६**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**